नि.दि.दावा क्र. २५/२०१६
निवृत्ती वि. श्रीरंग

## निशाणी क्र. १९ वरील आदेश

सदरच्या अर्जाचे व वादीने दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. १ ते ५ आपले म्हणणे किंवा कैफियत दाखल करण्यास तयार आहेत. ते अशिक्षित, अडाणी असल्याने, कायदयाची माहिती नसल्यामुळे व काही प्रतिवादी काम धंदयाकरीता परगावी असल्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्यात वेळेमध्ये कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द 'एकतर्फा' असा आदेश पारीत करण्यात आला. म्हणून त्यांनी सदरचा अर्ज दाखल करुन त्यांचेविरुध्द 'एकतर्फा' असा पारीत केलेला आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे किंवा कैफियत स्वीकारणे न्याय व गरजेचे आहे अशी विनंती केली आहे.

०२. सदरच्या अर्जावर वादीने आक्षेप नोंदवून नमूद केले की, प्रस्तुतच्या अर्जातील मजकूर खरा व बरोबर नाही. प्रतिवादींनी कैफियत देण्यास मुद्दामपणे उशीर केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी नक्कीच निष्काळजीपणाचे वर्तन केले, परंतु दाव्यातील गुंतागुंत सोडविण्याकरिता तसेच नैसिर्गक न्यायाचा विचार करून मी खालील निर्णयापर्यत येते.

## –: आ दे श :–

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रत्येकी रक्कम रू. २००/– इतका खर्च न्यायालयात जमा करावा व त्यानंतर सदरील रक्कम सरकार खात्यात जमा करावी.

(कु. एस. एस. बजाज)

दिनांक: ०१.१०.२०२२. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), दहिवडी